नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल®
सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७५। किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.)
मंगळवार १७/११/२०२६ पाने - ६

फराळ, फटाके जिकडे तिकडे.
दिवाळी म्हणजे राजेन्द्रचे कपडे
दिवाळी आली, चला 'राजेन्द्र'मध्ये!
खास दिवाळीसाठी असंख्य व्हरायटीज.
१९५९ पासून राजेन्द्र क्लॉथ स्टोअर्स
मेन रोड, संगमनेर.
फोन : 02425-225740, 79010 31155

संगमनेरात चोरट्यांचे प्रताप सुरूच

चोऱ्या, घरफोड्यांमुळे महिलांमध्ये भिती, पोलीसांविरूद्ध संताप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, घरफोड्या, चैन स्नॅचिंग आणि बॅग लिफ्टिंगच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या दीड महिन्यात शहर व परिसरात तब्बल १७ ठिकाणी घरफोड्या झाल्याची माहिती समोर येत असून, सणासुदीच्या काळातही चोरट्यांचा उच्छाद सुरूच आहे. अभिनवनगर, मोतीनगर, शारदा सोसायटी आणि रहेमतनगरसह विविध उपनगरांमध्ये चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. विशेषतः महिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पेट्रोल पंपावर साडेपाच लाख रुपयांची बॅग लिफ्टिंग, बसस्थानक परिसरातील चोऱ्या, सलग घरफोड्या आणि महिलांच्या दागिन्यांवर डल्ला मारण्याच्या घटनांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक बनली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटना घडत असताना अद्याप घरफोड्यांचा छडा लागलेला नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याऐवजी पोलिसांकडून केवळ घटनांनंतर धावपळ होत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



शहरातील बसस्थानक, मुख्य बाजारपेठ, पेट्रोल पंप, सोसायट्या आणि उपनगरांमध्ये नियमित व प्रभावी पोलिस गस्त सुरू करावी. संशयितांवर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करावी. घरफोडीच्या घटनांचा तातडीने तपास करून चोरट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संगमनेर शहरातील रहेमतनगर परिसरात अब्दुल्ला मस्जिदजवळ चोरट्यांनी बंद घराला लक्ष्य करत मोठी तोडफोड केली. जावेद मोहंमद पटेल यांचे कुटुंब मागील आठवड्यात राजस्थानमधील अजमेर येथे गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून चोरी केल्याची घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

रविवारी (दि. १५) सकाळी सुमारे ११ वाजता शेजारील महिलेने पटेल कुटुंबीय परत आले असावेत, या समजुतीने घराकडे हाक मारली. मात्र, बराच वेळ प्रतिसाद न मिळाल्याने तिने घराजवळ जाऊन पाहिले असता मुख्य गेटचे कुलूप तुटलेले आणि गेट उघडे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर शेजाऱ्यांनी अजमेर येथे असलेल्या पटेल कुटुंबीयांना फोन करून घटनेची माहिती दिली. तसेच संगमनेर शहर पोलिसांना कळविण्यात आले.

पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी तातडीने पोलिस पथक घटनास्थळी रवाना केले. चोरट्यांनी पहार आणि सळईच्या साहाय्याने घरातील खालच्या व वरच्या मजल्यावरील तब्बल सहा लोखंडी दरवाजे तोडले. घरातील दोन लोखंडी कपाटे आणि शोकेसचीही तोडफोड करून सामान अस्ताव्यस्त फेकून दिले. घरमालक बाहेरगावी असल्याने चोरीला गेलेला नेमका ऐवज, दागिने व रोख रक्कम किती आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पंचनामा व तपास सुरू आहे.

शहरातील गजबजलेल्या अभिनवनगर परिसरातही रविवारी पहाटे दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या. एका ठिकाणी चोरट्यांनी मोठा डल्ला मारला, तर दुसऱ्या ठिकाणी त्यांच्या हाती काहीही लागले नाही. मात्र, या घटनांमुळे परिसरातील नागरिक विशेषतः महिला चांगल्याच हादरल्या आहेत. शहरात दररोज कुठे ना कुठे चोरी अथवा घरफोडी होत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडतानाही सुरक्षिततेची चिंता सतावत आहे. बंद घरे चोरट्यांच्या निशाण्यावर असल्याने

(पान ५ वर)

शादी डॉट कॉमवर ओळख, लग्नाचे आमिष आणि अत्याचार

पोलीस अधीक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्याविरुद्ध संगमनेरात गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शादी डॉट कॉम या विवाहविषयक संकेतस्थळावरून झालेली ओळख, त्यानंतर सुरू झालेले प्रेमाचे गोड बोलणे आणि लग्नाचे आमिष दाखवून विश्वास संपादन केल्यानंतर महिलेवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार संगमनेर शहरात उघडकीस आला आहे. लग्नाची वेळ आली असता टाळाटाळ करून महिलेचा संपर्क तोडल्याने अखेर पीडित महिलेने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी नाशिक येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात कार्यरत असलेल्या विश्वास रामनाथ जाधव (रा. नाशिक) याच्याविरुद्ध बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ मे ते ५ जून २०२६ या कालावधीत वेळोवेळी घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



पतीच्या निधनानंतर दुसऱ्या विवाहाचा निर्णय

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला संगमनेर शहरातील नामांकित महाविद्यालय परिसरात राहते. तिच्या पतीचे रस्ते अपघातात निधन झाले असून, तिला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. पतीच्या निधनानंतर मानसिकदृष्ट्या खचलेल्या या महिलेने आपल्या मुलांना आधार मिळावा आणि कुटुंबाला पुन्हा स्थैर्य मिळावे, या उद्देशाने दुसऱ्या विवाहाचा निर्णय घेतला होता. त्यासाठी तिने शादी डॉट कॉम या विवाहविषयक संकेतस्थळावर नोंदणी केली होती.

ऑनलाइन ओळखीतून प्रेमाचे जाळे

१६ मे २०२६ रोजी आरोपी विश्वास जाधव याने पीडित महिलेला संकेतस्थळावरून संपर्क साधला. आरोपी हा सैन्यातून निवृत्त असून, सध्या नाशिक येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात कार्यरत असल्याचे समजते. सुरुवातीला फोनवरून संवाद सुरू झाला. त्यानंतर व्हॉट्सप चॅटिंगच्या माध्यमातून दोघांची ओळख वाढत गेली. हळूहळू या ओळखीचे रूपांतर मैत्रीत आणि पुढे जवळिकीमध्ये झाले.

(पान ४ वर)

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

दिपावली धमाका ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
25% सूट
ऑफर कालावधी : 5 ते 30 नोव्हेंबर 2026
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्स
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर ☎ ०२४२५ - २२३८६२ ७५८८२ ४९८४९

२२ दिवसांच्या अथक शोधमोहिमेनंतर अखेर आकाशचा मृतदेह सापडला!

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - प्रवरा नदीच्या पाण्यात बुडून बेपत्ता झालेल्या सुगाव बुद्रुक येथील आकाश पथवे या तरुणाचा मृतदेह तब्बल २२ दिवसांच्या अथक शोधमोहिमेनंतर अखेर सोमवारी (दि. १६) बचाव पथकाच्या हाती लागला. कळस शिवारातील पुलाजवळ पाण्यात वाहत आलेला मृतदेह ग्रामस्थांनी बाहेर काढला. बेपत्ता तरुणाचा मृतदेह आढळल्याने महिनाभरापासून सुरू असलेल्या शोधमोहिमेची अखेर झाली. या घटनेने सुगाव बुद्रुकसह परिसरात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सुगाव बुद्रुक येथील बाळू शिंदे आणि आकाश पथवे हे दोघे तरुण गावाजवळील प्रवरा नदीवरील केटीवेअर परिसरात अंघोळीसाठी गेले होते. यावेळी बाळू शिंदे हा पाण्यात बुडू लागला. त्याला वाचविण्यासाठी आकाश पथवे याने क्षणाचाही विचार न करता पाण्यात उडी घेतली. मात्र, दुर्दैवाने दोघेही पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले.

(पान २ वर)

सणासुदीत
सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50% पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने व्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...
वसनीय कापडांची अखंड परंपरा राजपाल

हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008
GOVT. APPROVED VALUER
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने
HUID हॉलमार्क प्रमाणित
सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
*नियम व अटी लागू
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

वंचितांचा सन्मान हीच खरी समाजसेवा

संपादक हासेंनी केला वंचितांचा सन्मान, चंद्रकांत खामकरांची २५ हजारांची मदत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजातील वंचित, श्रमिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सन्मानाची वागणूक देऊन त्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी समाजसेवा आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा गौरव हा सामाजिक एकतेला बळ देणारा आणि प्रेरणादायी उपक्रम असल्याचे प्रतिपादन दैनिक युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे यांनी केले.

चर्मकार विकास संघ, महाराष्ट्र राज्य, शाखा संगमनेर यांच्या वतीने हॉटेल वेदस येथे चर्मकार समाजातील गटई व्यवसाय करणाऱ्या श्रमिकांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी समाजातील श्रमिकांना किराणा साहित्याचे किट व मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, उद्योजक तथा माजी सैनिक चंद्रकांत खामकर, संघाचे अध्यक्ष सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर, मार्गदर्शक कारभारी देव्हारे सर, रामदास सोनवणे, अर्जुन वाघ, श्री. पोटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संघाचे अध्यक्ष सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर यांच्या हस्ते किसन हासे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. चर्मकार विकास संघाची संगमनेर तालुक्यातील नूतन कार्यकारिणी सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर यांच्या नेतृत्वाखाली समाजाभिमुख कार्यासाठी सक्रिय झाली आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, संघटन मजबूत करणे आणि सामाजिक बांधिलकी जपत विधायक उपक्रम राबविणे, हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे. याच भावनेतून समाजातील शिक्षक, अभियंते, व्यावसायिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटई कामगारांचा गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात किसन भाऊ हासे, सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर आणि उद्योजक चंद्रकांत खामकर यांच्या हस्ते श्रमिकांना किराणा साहित्याचे किट व मिठाई प्रदान करण्यात आली. श्रमाला प्रतिष्ठा आणि वंचितांना सन्मान देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. संघटनेच्या सामाजिक कार्याला हातभार लावण्यासाठी उद्योजक तथा माजी सैनिक चंद्रकांत खामकर यांनी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. त्यांच्या या सामाजिक योगदानाबद्दल संघटनेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

आपल्या मनोगतात किसन भाऊ हासे यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत वंचित घटकांचा सन्मान करणे ही समाजासाठी प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा वाढतो आणि समाजातील दुर्लक्षित घटकांना आत्मविश्वास मिळतो, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. चंद्रकांत खामकर यांनीही उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्ष सुभेदार मेजर जगन्नाथ खामकर यांनी संघटनेच्या भावी वाटचालीची दिशा स्पष्ट करत समाजाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष कारभारी वाकचौरे, रामनाथ सातपुते, सोमनाथ कांबळे, भाऊसाहेब सोनवणे, ज्ञानदेव कांबळे, प्रदीप कांबळे, बाळासाहेब वाघ, सौ. संगीता वाकचौरे, सौ. उषा कांबळे तसेच कार्यकारिणी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल वाकचौरे सर यांनी केले, तर ज्ञानदेव कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले.

भरधाव कारची सायकलला धडक

दोन चिमुकल्यांचा जागीच मृत्यू

अहिल्यानगर (प्रतिनिधी) : कर्जत तालुक्यातील निंबोडी फाटा येथे भरधाव इर्टिगा कारने सायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दोन बालकांचा जागीच मृत्यू झाला. चैतन्य छगन उदमले (वय ८) आणि ओंकार बापू उदमले (वय १०) अशी मृत बालकांची नावे आहेत. १४ नोव्हेंबर रोजी घडलेल्या या भीषण अपघाताने निंबोडी व शितपूर परिसरात शोककळा पसरली आहे.

दोन्ही बालके सायकलवरून शितपूर फाट्याकडून निंबोडी फाट्याकडे जात असताना श्रीगोंद्याकडून जामखेडच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव इर्टिगा कारने (एमएच ०४ जेबी २२०४) दशरथ बापू फुले यांच्या घरासमोर त्यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. धडकेत दोन्ही बालके गंभीर जखमी झाली. मात्र, त्यांना वाचविण्यात यश आले नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर व सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी चैतन्यचे वडील छगन मारुती उदमले यांच्या फिर्यादीवरून कारचालक संदीप दामोदर उदमले (रा. ठाणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास विजय झंजाड करीत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अवघ्या आठ आणि दहा वर्षांच्या चिमुकल्यांचा अशा प्रकारे अपघाती मृत्यू झाल्याने नागरिकांमधून तीव्र दुःख व्यक्त होत आहे.

पुण्यात अजितदादांच्या पुतळ्याचे अमित शहांच्या हस्ते अनावरण



पुणे (प्रतिनिधी)

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज पुण्यात दिवंगत नेते अजित दादा पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. हा सोहळा पुणे जिल्हा परिषदेच्या पहिल्या मजल्यावर पार पडला. या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात मोठे शक्तीप्रदर्शन केल्याचे पाहायला मिळाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सध्या दोन दिवसांच्या पुणे दौऱ्यावर असून, आज त्यांच्या दौऱ्याचा दुसरा दिवस होता. त्यांच्याच हस्ते दिवंगत अजित पवारांच्या या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक महत्त्वाचे नेते, मंत्री आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अनावरण सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांचे नाव प्रमुख पाहुणे म्हणून छापण्यात आले होते. मात्र, असे असूनही शरद पवार या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्याऐवजी पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली आणि दिवंगत अजितदादांच्या स्मृतींना अभिवादन केले.पुतळा अनावरणासोबतच पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारालाही दिवंगत अजित दादा पवार यांचे नाव देण्यात आले आहे. या संपूर्ण सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे अजित दादांच्या पुतळ्याचे अनावरण. पुतळा अनावरणाच्या मुख्य कार्यक्रमानंतर पुण्यातील नेहरू मेमोरियल हॉल येथे एका छोट्या सभेचेही आयोजन करण्यात आले होते, जिथे उपस्थित नेत्यांनी अजितदादांच्या कार्याला आणि आठवणींना उजाळा दिला.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची उपस्थिती, राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आणि इतर नेत्यांची मांदियाळी पाहता, पुणे जिल्हा परिषद परिसर आणि नेहरू मेमोरियल हॉल परिसरात अत्यंत कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सुरक्षेच्या कारणास्तव आजूबाजूच्या मार्गांवरही चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

सोने १ लाखांच्या दिशेने? चांदीतही मोठी घसरण!



सोने आणि चांदीच्या दरांमध्ये सातत्याने घसरण सुरू आहे. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी वायदे बाजारात सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्याचा भाव एका झटक्यात सुमारे १,४०० रुपयांनी कमी झाला. दुसरीकडे, चांदीच्या दरातही सुमारे ६ हजार रुपयांची घसरण नोंदवण्यात आली.गेल्या काही दिवसांपासून सोने १ लाख रुपयांच्या पातळीपर्यंत खाली येऊ शकते, असा अंदाज काही तज्ज्ञांनी व्यक्त केला होता. सध्याची घसरण पाहता या अंदाजांची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.बाजार उघडताच सोन्याचे दर घसरलेसोमवारी चउद वर वायदे व्यवहार सुरू होताच सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये घसरण झाली. ४ डिसेंबर रोजी एक्स्पायरी असलेले २४ कॅरेट सोन्याचे १० ग्रॅमचे वायदे मागील आठवड्याच्या शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी १,३६,७०५ रुपयांवर बंद झाले होते. सोमवारी बाजार उघडल्यानंतर हा भाव घसरून १,३५,३१२ रुपये प्रति १० ग्रॅमवर आला. म्हणजेच सोन्याच्या किमतीत १,३९३ रुपयांची घट झाली.सोन्याच्या उच्चांकापासून ४२ हजार रुपयांची घसरणचउद वर ४ डिसेंबर एक्स्पायरी असलेल्या २४ कॅरेट सोन्याचा आतापर्यंतचा उच्चांक १,७७,५९० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवण्यात आला आहे. सध्याच्या १,३५,३१२ रुपयांच्या भावाशी तुलना करता सोने आपल्या उच्चांकापासून ४२,२७८ रुपयांनी स्वस्त झाले आहे. सोन्याच्या दरातील या मोठ्या घसरणीमुळे गुंतवणूकदार आणि खरेदीदारांचे लक्ष पुन्हा या मौल्यवान धातूकडे लागले आहे. मात्र, वायदे बाजारातील दर आणि प्रत्यक्ष दागिने खरेदीचे दर यामध्ये फरक असतो, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.सोने १ लाख रुपयांच्या पातळीवर येणार?आंतरराष्ट्रीय बाजारात जानेवारी महिन्यात नोंदवलेल्या विक्रमी उच्चांकापासून सोन्याच्या किमतीत सुमारे ३० टक्क्यांची घसरण झाल्याचा दावा वृत्तात करण्यात आला आहे. भारतीय बाजारातही सोन्याच्या दरांमध्ये घसरण सुरू आहे. सणासुदीच्या काळात सोन्याचे भाव कमी झाल्यानंतर आता लग्नसराईचा हंगाम सुरू होण्यापूर्वी ही घसरण आणखी वेगाने होताना दिसत आहे.चांदीच्या दरातही मोठी घसरणसोन्याबरोबरच चांदीच्या किमतींमध्येही घसरणीचे सत्र कायम आहे. सोमवारी चउद वर ४ डिसेंबर एक्स्पायरी असलेल्या चांदीच्या वायदे व्यवहारांना सुरुवात होताच भावात सुमारे ६ हजार रुपयांची, म्हणजेच ३ टक्क्यांहून अधिक घसरण झाली.

पान १ वरून

२२ दिवसांच्या अथक...

घटनेची माहिती मिळताच शोधकार्य सुरू करण्यात आले. बचाव पथकाने अथक प्रयत्नांनंतर बाळू शिंदे यांचा मृतदेह शोधून बाहेर काढला. मात्र, आकाश पथवे याचा शोध लागत नव्हता. त्यामुळे त्याच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थांची चिंता वाढली होती. गेल्या २२ दिवसांपासून नदीपात्रात आणि आजूबाजूच्या परिसरात विविध पथकांकडून शोधमोहीम राबविण्यात येत होती.

संगमनेर येथील राहुल पांडे यांचे बचाव पथकही गेल्या अनेक दिवसांपासून आकाशचा शोध घेत होते. मात्र, वारंवार प्रयत्न करूनही त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता. अखेर सोमवारी सकाळी कळस शिवारातील पुलाजवळ पाण्यात एक मृतदेह वाहत येत असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. यानंतर गावातील तरुणांनी तत्काळ पुढाकार घेत मृतदेह पाण्याबाहेर काढला. दीर्घकाळ पाण्यात राहिल्यामुळे मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब झाली होती. मात्र, बेपत्ता आकाशच्या कुटुंबीयांनी मृतदेहाची ओळख पटवून तो आपलाच मुलगा आकाश पथवे असल्याचे निश्चित केले. त्यामुळे गेल्या २२ दिवसांपासून सुरू असलेल्या शोधमोहिमेला अखेर पूर्णविराम मिळाला. दरम्यान, या घटनेची अकोले पोलिसांनी अकस्मात मृत्यू म्हणून नोंद केली असून, पुढील तपास अकोले पोलीस करीत आहेत. आकाशचा मृतदेह सापडल्याची बातमी समजताच सुगाव बुद्रुक गावावर शोककळा पसरली.

महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर

यांचे कार्यालय सहकार महर्षी गोपाळरावजी सोलेपाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, चाहुराणा बु.अहिल्यानगर

ईमेल आयडी:-ddr_anr@rediffmail.com दूरध्वनी क्रमांक:- (२४१) २४५००५५

जाहिर नोटीस

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि.घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर या बँकेने कर्जदारांच्या थकबाकीपोटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम १०१ अन्वये मिळविलेल्या वसुली प्रमाणपत्राचे आधारे कार्यवाही केल्यानंतर जप्त केलेल्या मालमत्तेचे अपसेट प्राईज मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केलेले असून त्या अनुषंगाने बँकेचे कर्जदार/जामीनदार यांना सुनावणी नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आल्या होत्या व या कार्यालयामध्ये दि. ५/११/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सुनावणीचे सुनावणी नोटीस लागू झाल्या बाबत पोच पावत्या अगर नोटीस प्राप्त न झाल्यास अथवा नोटीस बजावणी न झाल्याने त्यांना जाहिर सुनावणी देण्याचा निर्णय देण्यात आला. बँकेचे खालील कर्जदार /जामिनदार गैरहजर राहिलेले असून संस्थेने जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	कर्जदारांचे नाव	गांव	कर्जाच्या अनुषंगाने जप्त मालमत्ता केलेल्या मालमत्ता धारकाचे नांव	गांव	मिळकतीचे वर्णन	
					स.नं./गट नं.	क्षेत्र चौ.मि./हे.आर
१	मे.कर्मा अँग्रो अँड फुड प्रोसेसिंग प्रो. श्री.प्रतिक सुभाष थोरात (कर्जदार)	मौजे जोर्वे, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर	श्री.प्रतिक सुभाष थोरात (कर्जदार)	मौजे पिंपारणे, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	२२५/११	४० आर
					२२५/२	४८ आर
					२२५/६	२० आर
					२२५/७	२० आर
					२२५/९	२७ आर
			श्री.सतिष लक्ष्मण दिघे (जामिनदार)	मौजे समनापुर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	४२/१७/१	३० आर
			श्री.आण्णासाहेब भगवंता कानवडे (जामिनदार)	मौजे गुंजाळवाडी ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	६५/२	१.४० हे आर
२	श्री.अण्णासाहेब रंगनाथ थोरात (कर्जदार)	मौजे जोर्वे, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	श्री.आण्णासाहेब रंगनाथ थोरात(कर्जदार)	मौजे जोर्वे ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	२३१/१	२५ आर
					२३२/१	५३ आर पो ख ७ आर
					२३२/२	२६ आर पो ख १० आर
३			श्री.दिगंबर धोंडीभाऊ थोरात (जमिनदार)	मौजे जोर्वे ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	१३८/२	४५ आर
४	श्री. लालु किसन गाडे	सावरगावतळ, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	श्री.लालु किसन गाडे	सावरगावतळ, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर	३२०	२३ आर

अ.नं.	हस्तांरणापुर्वी मालमत्ता धारकाचे नाव	जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशिल	गट क्र./सव्हे नं/ मिळकत नं.	क्षेत्र
१	श्री.शरद भागवत गिरी (कर्जदार)	मौजे वेल्हाळे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१२७/३	४३ आर पो.ख.१ आर
			१२८/६/१	६३ आर पो.ख.१ आर

तेव्हा या जाहिर नोटीस अन्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणी म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी दिनांक १९/११/२०२६ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहिल्यानगर सहकार महर्षी गोपाळरावजी सोलेपाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, चाहुराणा बु., अहिल्यानगर यांचे दालनात दुपारी ठिक १२.०० वाजता समक्ष हजर रहावे आपण सदर दिवशी हजर न राहिल्यास अथवा आपले लेखी/तोंडी म्हणणे सादर न केल्यास आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन र हस्तांतरण प्रमाणपत्र पुढील कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(मंगेश सुरवसे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहिल्यानगर.

|| जनसेवा हिच ईश्वर सेवा ||

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

दूरध्वनी (०२४२५) २२५३०८, २२५१६५, फॅक्स -२२५९६३

E-mail - cosangamner@gmail.com

सनपा/गार्डन/१२/जा.क्र./२५२७/२०२६ दि. १६/११/२०२६

जाहिर आवाहन

संगमनेर शहर व उपनगरातील नागरिकांना याव्दारे सूचित करण्यात येते की, काही ठिकाणी विद्युत तारांलगतच्या फांद्या, खोडाची खराब स्थिती तसेच बांधकामात शिरलेली मुळे यांमुळे धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे संबधित वृक्षांचे पुनर्रोपण करणे व काही वृक्ष मुळासकट काढणे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	ठिकाण	प्रभाग	वृक्ष प्रकार	संख्या	नियोजित कृती
१	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	बकुळ	७	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
२	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	वड	१	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
३	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	स्प्याथोडीया	१	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
४	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	कदंब	३	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
५	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	प्लेटोफार्म	५	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
६	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	कांचन	१	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
७	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	मोहगणी	३	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
८	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	सिसू	१	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
९	नेहरु गार्डन समोरील मियावाकी (माळीवाडा)	७	काशिदा	१	मुळासकट काढणे, पुनर्रोपण करणे
१०	नवीन नगर रोड निघुते हॉस्पिटल लगत	४	पाम	२	मुळासकट काढणे
११	संजीवनी सोसायटी मालदाड रोड	३	काशिदा	२	मुळासकट काढणे

सदर २३ वृक्षांचे पुनर्रोपण व ४ वृक्ष मुळासकट काढण्याचे काम नगरपरिषदेच्या वृक्षारोपण विभागाच्या देखरेखीखाली करण्यात येईल. पुनर्रोपण शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात येईल व पुनर्रोपित वृक्षांची देखभाल नगरपरिषद करील, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील लागू तरतुदींनुसार भरपाई वृक्षारोपण करण्यात येईल.

वरील प्रस्तावाबाबत नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास, त्या जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **सोमवार, दि.२३/११/२०२६ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत** वृक्षरोपण विभाग, संगमनेर नगरपरिषद कार्यालय, संगमनेर येथे लेखी सादर कराव्यात.

(श्री.दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(सौ.डॉ.मैथिली तांबे)
नगराध्यक्ष
संगमनेर नगरपरिषद,संगमनेर

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

संगमनेरच्या 'अमृतवाहिनी'चा राष्ट्रीय स्तरावर दुहेरी सन्मान!

गोव्यात आयएसटीईचे दोन मानाचे पुरस्कार प्रदान



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी रोवलेल्या शैक्षणिक बीजाचा आज एका समृद्ध वटवृक्षामध्ये विस्तार झाला आहे. आयएसटीईच्या माध्यमातून मिळालेले हे दोन राष्ट्रीय बहुमान हा संपूर्ण अमृतवाहिनी कुटुंबासाठी अत्यंत गर्वाची अन् अभिमानाची बाब आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच त्यांच्यामध्ये नवसंशोधन, उद्योजकीय दृष्टी आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव रुजवण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अविरत कष्टांचे हे फळ आहे.

– शरयू देशमुख,व्यवस्थापकीय विश्वस्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर या स्वायत्त महाविद्यालयाने शैक्षणिक, नवोपक्रम आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई), नवी दिल्ली घोषित करण्यात आलेले 'आयएसटीई उत्कृष्ट हरित परिसर पुरस्कार (बेस्ट ग्रीन कॅम्पस अवॉर्ड)' आणि 'आयएसटीई उत्कृष्ट नवोपक्रम आणि स्टार्टअप परिसंस्था पुरस्कार (बेस्ट इनोव्हेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टम अवॉर्ड)' हे दोन प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी गोवा येथील 'हॉटेल रोनिल जेडी हयात' येथे आयोजित दिमाखदार पारितोषिक वितरण करण्यात आले.

विशेष म्हणजे, आयएसटीई कडून महाविद्यालयास यापूर्वी म्हणजेच मागील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सुद्धा 'बेस्ट इंजिनिअरिंग कॉलेज अवॉर्ड' मिळालेला होता. सलग दोन्ही शैक्षणिक वर्षात आयएसटीईचे राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारे 'अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय' हे संपूर्ण महाराष्ट्र व गोवा विभागातून एकमेव महाविद्यालय ठरले आहे.

गोव्यातील संपन्न झालेल्या दिमाखदार सोहळ्यात पारितोषिक वितरण सोहळ्यास तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते, ज्यांच्या हस्ते अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला. यामध्ये टेक्नो इंडिया विद्यापीठ (पश्चिम बंगाल) चे कुलगुरू प्रा. (डॉ.) सैकत मैत्रा, आयएसटीईचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह देसाई, आयएसटीई महाराष्ट्र-गोवा विभागाचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) रणजित सावंत, आयएसटीई महाराष्ट्र-गोवा विभागाचे सचिव प्रा. के. पी. कुंभार आणि आयएसटीई नवी दिल्लीचे कार्यकारी सचिव डॉ. एस. एम. अली यांचा समावेश होता.

सदर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्त व सचिव मा. शरयूताई देशमुख, विश्वस्त अनिल शिंदे आणि मॅनेजर व्ही. बी. धुमाळ यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, ग्रीन कॅम्पस प्रस्तावाचे समन्वयक डॉ. एस. बी. कांडेकर आणि इन्क्युबेशन सेंटरचे प्रमुख डॉ. डी. एस. बजाज, आयएसटीई समन्वयक डॉ. एम. ए. वाकचौरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

नॅककडून A+ श्रेणी प्राप्त, ५ वेळा एन.बी.ए. मान्यताप्राप्त आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न असलेल्या या महाविद्यालयाच्या दुहेरी राष्ट्रीय बहुमानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त मा. शरयूताई देशमुख, प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून अमृतवाहिनी महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कीर्तनकार दौलत महाराजांची आत्महत्या?

जालना (वृत्तसंस्था)

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात असलेल्या अवघडराव सावंगी येथे एका महाराजांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आल्याने आढळून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, आदल्या दिवशी रात्री गावात कीर्तन करून आपल्या मठात परतलेले ४१ वर्षीय दौलत रामनाथ सातपुते महाराज दुसऱ्या दिवशी सकाळी मृतावस्थेत आढळले. त्यातच घटनास्थळावरून महाराजांचा मोबाईल फोन गायब असल्याची बाब समोर आल्यानं या घटनेचं गूढ अधिकच वाढलं आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून तपासातून नेमकं सत्य समोर येण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दौलत रामनाथ सातपुते महाराज (वय ४१, मूळ रा. मुसळगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक) हे मागील ८ ते १० वर्षांपासून भोकरदन तालुक्यातील अवघडराव सावंगी येथील पाताळेश्वर मंदिर परिसरातील मठात वास्तव्यास होते. या ठिकाणाहून ते धार्मिक कीर्तन आणि समाजप्रबोधनाचे कार्य करीत होते. गावोगावी जाऊन कीर्तनाच्या माध्यमातून तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे आई-वडिलांची सेवा करावी, तसेच राष्ट्रसेवेला प्राधान्य द्यावे, असा मोलाचा संदेश ते देत असत. बाहेर न आल्यानं गावकऱ्यांना संशय शनिवारी रात्री सुमारे १० वाजेपर्यंत अवघडराव सावंगी येथे त्यांचे कीर्तन झाले. कीर्तन संपल्यानंतर ते नेहमीप्रमाणे आपल्या मठात परतले आणि खोलीत झोपले मात्र, आज रविवारी रोजी सकाळी बराच वेळ होऊनही महाराज बाहेर न आल्यानं मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या गावकऱ्यांना संशय आला. गावकऱ्यांनी त्यांचा इतरत्र शोध घेतला. मात्र, ते कुठेही आढळून आले नाहीत. अखेर त्यांच्या राहत्या खोलीत पाहणी केली असता भगव्या रंगाच्या रुमालाच्या साहाय्यानं गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला.

अहिल्यानगरमध्ये अत्याधुनिक आय हॉस्पिटल सुरू

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सोहळा, आ. तांबे उपस्थित



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- आयुर्वेदाच्या प्राचीन आणि समृद्ध परंपरेला आधुनिक संशोधनाची जोड देत नेत्ररोगांवर उपचार करणाऱ्या 'दृष्टिदा आयुर्वेदिक आय हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर'चा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. या सोहळ्यास आमदार सत्यजीत तांबे, खासदार डॉ. निलेश लंके आणि लोकप्रिय व्याख्याते प्रा. गणेश शिंदे उपस्थित होते.

यावेळी आमदार सत्यजीत तांबे यांनी आयुर्वेदाच्या माध्यमातून आधुनिक उपचारपद्धती विकसित करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होण्यासाठी अशा आरोग्य संस्थांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि समृद्ध आरोग्य परंपरा असून, या परंपरेला आधुनिक संशोधनाची जोड देत नेत्ररोगांवर उपचार करण्याचा दृष्टिदा हॉस्पिटलचा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अहिल्यानगरसह परिसरातील ग्रामीण भागातील रुग्णांना नेत्रोपचारांच्या सुविधा उपलब्ध होण्यास या केंद्राची मदत होणार आहे.

रुग्णसेवेचा ध्यास घेऊन सुरू झालेल्या या नव्या सेवापर्वासाठी अरुण (दादा) जाधव, अरविंद जाधव, धनंजय जाधव, डॉ. गणेश जाधव यांच्यासह संपूर्ण जाधव परिवार आणि दृष्टिदा हॉस्पिटलच्या टीमचे अभिनंदन करण्यात आले.

राजूर येथे भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती, जनजातीय गौरव दिन तसेच जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह-२०२६ प्रकल्प कार्यालय, राजूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जल-जंगल-जमीन आणि आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस व इतर आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रकल्प कार्यालय पासून राजूर गावातून प्रभातफेरीने झाली. आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे चौक, पिचड बंगला, महादेव मंदिर, बाजारपेठ अशी करणेत आली. यावेळी माजी आ. वैभव पिचड यांनी आपल्या निवासस्थानाजवळ आदिवासी नृत्यचे सर्वांचे स्वागत केले. यामध्ये आदिवासी कला पथके, पवित्र पोर्टलद्वारे नवनियुक्त शिक्षक, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच आ. किरण लहामटे यांनीही त्यांच्या निवासस्थान समोर स्वागत केले



तसेच गडचिरोली येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे शासकीय आश्रमशाळा केळी रुम्हणवाडी, पैठण व घाटघर येथील वसतिगृह, बहुउद्देशीय हॉल आणि प्रयोगशाळा इमारतींचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी आ. डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना मंजूर योजनांचे चेक वाटप करण्यात आले. तसेच प्रकल्प कार्यालयाच्या आश्रमशाळांमध्ये पवित्र पोर्टलद्वारे नव्याने नियुक्त झालेल्या ६६ शिक्षण सेवक व शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात विविध आदिवासी कला पथकांनी पारंपरिक फुगडी, टिपरी फुगडी व नृत्य सादर केले; तर मवेशी येथील पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षणार्थी आणि अकोले तालुक्यातील बचत गटांनी सहभाग नोंदवला. या वेळी प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी उपस्थित ना मार्गदर्शन केले . तर सहाय्यक प्रकल्प अधिकारी मनोजकुमार पैठणकर, तुषार पवार, दीपक कालेकर, लेखा अधिकारी संजय सुसलादे, कार्यालयीन अधीक्षक सुनीलकुमार मोरे, प्रमोद शिंदे यांच्यासह मान्यवर, मुख्याध्यापक, गृहपाल व कर्मचारी उपस्थित होते.

पवळा भालेराव हिवरगावकर लोककला महोत्सवासाठी निधी मंजूर - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील लोककलेची समृद्ध परंपरा जतन करण्यासाठी तसेच तमाशा कलावंतांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हिवरगाव पावसा येथील पहिल्या महिला तमाशा कलावंत पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणाऱ्या लोककला महोत्सवासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडून निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी आ. अमोल खताळ यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, लवकरच हिवरगाव पावसा येथे लोककला महोत्सव आणि पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

संगमनेर परिसराला लोककलेची समृद्ध परंपरा लाभली आहे. तमाशा कलेच्या



माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांचे स्मरण व्हावे, त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि नव्या पिढीला लोककलेची ओळख व्हावी, या उद्देशाने आमदार खताळ यांनी मागील वर्षापासून संगमनेर तालुक्यातील ज्येष्ठ तमाशा कलावंतांच्या नावाने पुरस्कार देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार मागील वर्षी संगमनेरच्या ज्येष्ठ तमाशा कलावंत स्व. कांताबाई सातारकर यांच्या नावाने वाई तालुक्यातील ज्येष्ठ तमाशा कलावंत आवळे मास्तर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

यंदा हा पुरस्कार हिवरगाव पावसा येथील स्व. पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या नावाने देण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या स्मरणार्थ लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणाही आमदार खताळ यांनी हिवरगाव पावसा येथील कार्यक्रमात केली होती. या माध्यमातून लोककलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलावंतांचा सन्मान करण्याबरोबरच या कलेचे जतन आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या लोककला महोत्सवासाठी अंदाजे नऊ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, त्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार खताळ यांनी २ नोव्हेंबर २०२६ रोजी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. या नंतर त्यांनी सातत्याने पाठपुरावा करत लोककलेचे जतन, संवर्धन आणि ज्येष्ठ कलावंतांचा सन्मान करण्यासाठी अशा महोत्सवांचे महत्त्व सांस्कृतिक विभागाच्या निदर्शनास आणून दिले. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिवांना पत्र पाठवून या महोत्सवासाठी निधीची तरतूद करण्याची विनंती केली होती. त्यानंतर सांस्कृतिक कार्य विभागाचे अवर सचिव बाळासाहेब सावंत यांनी महोत्सवाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देत सहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे हिवरगाव पावसा येथे लवकरच लोककला महोत्सव आणि पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असून, त्याची तारीख जाहीर करण्यात येणार आहे.

संगमनेर तालुक्याला लोककलेची मोठी परंपरा लाभली आहे. या कलेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांचे योगदान पुढील पिढीपर्यंत पोहोचले पाहिजे. त्यांचे स्मरण आणि सन्मान व्हावा, या उद्देशाने स्व. पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या स्मरणार्थ लोककला महोत्सव आयोजित करण्याचा निर्णय घेतला. यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठपुरावा केला होता. विभागाने सहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, लवकरच महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख जाहीर करण्यात येईल.

– आ. अमोल खताळ, संगमनेर

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाने बनावट इंस्टाग्राम अकाऊंट, सायबर पोलिसांकडून गुन्हा दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक -आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची फसवणूक आणि दिशाभूल करण्याचा प्रयत्न समोर आला आहे. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अधिकृत सोशल मीडिया अकाऊंट असल्याचे भासवून इंस्टाग्राम वर बनावट अकाऊंट तयार करण्यात आले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर नाशिक शहर सायबर पोलिसांनी संबंधित अकाऊंटधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे सोशल मीडियावरून कुंभमेळ्याची माहिती घेताना नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

नाशिक शहर सायबर पोलीस ठाण्याचे पथक सोशल मीडियावरील संशयास्पद हालचालींवर नियमित लक्ष ठेवत आहे. १५ नोव्हेंबर रोजी सायबर पेट्रोलिंग सुरू असताना इंस्टाग्रामवर 'official.kumbhnagarišnashik' या नावाने एक अकाऊंट पोलिसांच्या निदर्शनास आले. या अकाऊंटची तपासणी केली असता, त्यावर आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याशी संबंधित विविध कार्यक्रमांचे रील्स आणि पोस्ट शेअर केल्या जात असल्याचे आढळले. विशेष म्हणजे, हे अकाऊंट 'सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक' या शासकीय कार्यालयाचे अधिकृत सोशल मीडिया पेज असल्याचे भासवण्यात आले होते.

शासकीय प्राधिकरणाच्या नावाचा वापर करून बनावट अकाऊंट चालवले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर सायबर पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली. अशा अकाऊंटच्या माध्यमातून नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरवली जाण्याची किंवा त्यांची दिशाभूल होण्याची शक्यता असल्याने संबंधित अकाऊंटधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आगामी सिंहस्थ कुंभमेळा तसेच इतर शासकीय योजना आणि कार्यक्रमांची माहिती मिळवताना नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून आणि प्रमाणित सोशल मीडिया अकाऊंटवरूनच माहिती घ्यावी, असे आवाहन नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे.

संपादकीय...

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन

विद्यार्थी हा राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार!

दरवर्षी १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांचे हक्क, शिक्षणाचे महत्त्व, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांची जाणीव करून देणारा हा दिवस आहे. या दिवसाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. १७ नोव्हेंबर १९३९ रोजी नाझी जर्मनीच्या सैन्याने झेकोस्लोव्हाकियातील प्राग येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर कठोर कारवाई केली होती. या घटनेत अनेक विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली, तर नऊ विद्यार्थी नेत्यांना मृत्युदंड देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या संघर्षाच्या स्मरणार्थ आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा केला जातो. विद्यार्थी हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा आधारस्तंभ असतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या विचारांवर, शिक्षणावर आणि संस्कारांवर उद्याच्या समाजाची दिशा अवलंबून असते. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, शास्त्रज्ञ, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी अशा विविध क्षेत्रांतील सक्षम व्यक्तिमत्त्वे विद्यार्थी जीवनातूनच घडत असतात. त्यामुळे विद्यार्थी जीवन हा केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्याचा काळ नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा आणि आयुष्याला योग्य दिशा देण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. आजच्या आधुनिक युगात शिक्षणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. इंटरनेट, डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ज्ञानाची अनेक दालने विद्यार्थ्यांसाठी खुली झाली आहेत. जगातील कोणत्याही विषयाची माहिती काही क्षणांत उपलब्ध होत आहे. मात्र, माहिती मिळविणे आणि त्या माहितीचा योग्य उपयोग करणे यात फरक आहे. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानवृद्धी, संशोधन आणि कौशल्यविकासासाठी करणे आवश्यक आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता वेळेचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आज शिक्षण क्षेत्रात गुणांच्या स्पर्धेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. दहावी-बारावीचे निकाल, प्रवेश परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांमधील यश यामुळे विद्यार्थ्यांवर अनेकदा मानसिक दबाव निर्माण होतो. मात्र, केवळ परीक्षेतील गुण म्हणजे विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्हे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगवेगळे कौशल्य आणि क्षमता असतात. कोणाला विज्ञानाची आवड असते, तर कोणाला कला, क्रीडा, साहित्य, संशोधन किंवा व्यवसाय क्षेत्रात रस असतो. त्यामुळे पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर आजही अनेक आव्हाने आहेत. शैक्षणिक सुविधा, आर्थिक परिस्थिती, योग्य मार्गदर्शन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना अपेक्षित संधी मिळत नाहीत. ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समान संधी मिळाली पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणेही महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, पाणी बचत, स्त्री-पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक सलोखा यांसारख्या विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा. स्वत:च्या प्रगतीसोबत समाजाच्या विकासाचाही विचार करणारा विद्यार्थीच खऱ्या अर्थाने आदर्श नागरिक बनू शकतो. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नसून विद्यार्थ्यांच्या समस्या, त्यांचे हक्क आणि त्यांच्या स्वप्नांचा विचार करण्याचा दिवस आहे. विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण, संस्कार, स्वातंत्र्य आणि संधी मिळाल्यास ते कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करू शकतात. अपयशाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करणे, जिज्ञासा जिवंत ठेवणे आणि ज्ञानाची कास धरणे हीच विद्यार्थ्यांच्या यशाची खरी गुरुकिल्ली आहे.

दुष्काळी मदतीसाठी ई-केवायसी अनिवार्य

शेतकऱ्यांनी तातडीने फार्मर आयडी काढावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे.

ग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करावी व आवश्यक पडताळणी पूर्ण करावी.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जाऊन फार्मर आयडी तयार करून घ्यावा. राज्यातील शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

आरबीआयचे अधिकारी शंतनु खुळे यांचा सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - यशापयशाची तमा न बाळगता सातत्यपूर्ण प्रयत्न आणि कठोर परिश्रमाने यश नक्कीच पदरात पडते.कुठल्याही ध्येयासाठी प्रयत्नांचे सातत्य हीच खरी आपल्या साध्याची वाटचाल असते असे प्रतिपादन शंतनु खुळे यांनी केले.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ग्रेड बी ऑफिसर (व्यवस्थापक) पदावर नियुक्तीनंतर वीरगाव ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी केलेल्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी वीरगावच्या विश्व हायटेक नर्सरीचे संस्थापक संचालक विरेंद्र थोरात हे होते.

वीरगाव ग्रामपंचायततर्फे आरबीआयचे अधिकारी शंतनु खुळे, नुकतीच एमबीबीएस पदवी प्राप्त करुन डॉक्टर पदवी मिळविणाऱ्या शरयु वाकचौरे आणि इयत्ता दहावीत प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अनुक्रमे खुशी दौंड,शर्वरी सहाणे,प्रगती पानसरे, संस्कृती कुमकर या विद्यार्थ्यांनींचा सत्कार सोहळा ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला.आंतरभारती रुरल एज्युकेशन ट्रस्ट तर्फे स्व.रामराव विठ्ठलराव वाकचौरे यांचे स्मरणार्थ या विद्यार्थ्यांनींना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि शाल प्रदान करुन उपस्थितांनी त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.वीरगावच्या सरपंच प्रगती वाकचौरे यांचे संकल्पनेतून सुरु झालेला स्त्री जन्माचा स्वागत सोहळाही यावेळी पार पडला.यावर्षी जन्मलेल्या सर्व मुलींचा आणि त्यांचे मातापित्यांचा यथोचित सत्कार करुन मुलींचे स्वागत करण्यात आले.

यावेळी शंतनु खुळे, डॉ. शरयु वाकचौरे आणि दहावीतील सन्मानार्थी विद्यार्थीनींनी आपल्या भाषणातून ग्रामस्थांप्रती कृतज्ञता व्यक्त करुन आभार मानले.कार्यक्रमाचे अध्यक्ष विरेंद्र थोरात म्हणाले पाल्याचे शिक्षण हेच यापुढील काळात पालकांचे उद्दीष्ट असायला हवे.शिक्षणाच्या माध्यमातूनच खरी क्रांती होत असल्याने कोणत्याही क्षेत्रातून अर्थार्जनासाठी शिक्षण हाच मुख्य पाया आहे.शिक्षणामुळेच माणसाच्या वैचारिक कक्षा रुंदावतात,विनय येतो,पात्रता तयार होते आणि पात्रता आली की अर्थार्जनाच्या वाटा सुरु होतात.म्हणून शुद्ध अर्थार्जनासाठी प्रथम विद्यार्जनाची अधिक आवश्यकता आहे.यासाठी शिक्षण हेच आपले ध्येय असायला हवे असेही विरेंद्र थोरात म्हणाले.स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या श्रीमती वर्षे मॅडम यांचेही विद्यार्थ्यांना उद्बोधक मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भाऊसाहेब तोरकड सर यांनी केले.यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ आनंदराव थोरात,अमृतसागर दुध संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, उपसरपंच जयवंत थोरात, ग्रामविकास अधिकारी श्रीमती वर्षा नेहे, सुप्रिया वाकचौरे,बाळासाहेब मुळे,अनिल डोळस,विजय वाघ,दिनेश वाकचौरे,किशोर देशमुख ,गणेश कुमकर,हरी रसाळ आदी मान्यवरांसह ग्रामस्थ उपस्थित होते.आभार वीरगाव सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन सुनिल वाकचौरे यांनी मानले.

पान १ वरून

शादी डॉट कॉमवर...

आरोपीने पीडित महिलेला तिच्या मुलांसह संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचे आश्वासन दिले. मात्र, आपला पत्नीशी अद्याप घटस्फोट झालेला नसल्याचे सांगत, तोपर्यंत आपण रिलेशनशिपमध्ये राहू, असेही त्याने कथितरीत्या सांगितले. या आश्वासनांमुळे महिलेचा त्याच्यावर विश्वास बसला.

तक्रारीनुसार, १९ मे २०२६ रोजी आरोपी विश्वास जाधव हा पीडित महिलेला भेटण्यासाठी संगमनेर येथे आला. शहरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये त्याने खोली आरक्षित केली. तेथे लग्न आणि मुलांच्या भवितव्याबाबत चर्चा करत, मुलांचा सांभाळ करण्याचे आश्वासन देऊन त्याने महिलेच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचा आरोप आहे. यानंतर ५ जून २०२६ रोजी आरोपी पुन्हा संगमनेर येथे आला. त्यावेळीही हॉटेलमध्ये भेटून महिलेच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याशिवाय वेळोवेळी हॉटेलमध्ये तसेच महिलेच्या राहत्या घरीही अत्याचार केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. दरम्यान, पीडित महिला आरोपीकडे लग्नाबाबत विचारणा करू लागली. मात्र, आरोपी विश्वास जाधव याने लग्न करण्यास टाळाटाळ सुरू केली. महिलेने त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्याने तिचा फोन नंबर ब्लॉक लिस्टमध्ये टाकून संपर्क पूर्णपणे बंद केला. लग्नाचे आश्वासन देऊन आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडित महिलेने संगमनेर शहर पोलीस ठाणे गाठले. तेथे तिने आपल्यासोबत घडलेला संपूर्ण प्रकार पोलिसांना कथन केला.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ रोजी विश्वास रामनाथ जाधव (रा. नाशिक) याच्याविरुद्ध बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. विवाहाच्या अपेक्षेने ऑनलाइन संकेतस्थळावरून ओळख वाढवताना विश्वास संपादन करून महिलांची फसवणूक होण्याचे प्रकार समोर येत असल्याने या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

ग्रामपंचायत कुरूंद, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. कुरुंद.. ता पारनेर जि अहिल्यानगर यांचे कडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा.बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून सीलबंद ब१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे कुरूंद येथे जि.प. शाळा व अंगणवाडीस सुशोभीकरण करणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	--	३३११०९/-	६ महिने	सु. बे.
२.	मौजे कुरूंद येथे ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत व बाहेरील परिसर सुशोभीकरण करणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	१%	२०१६१८/-	६ महिने	खुला
३.	मौजे कुरूंद येथे कचरा विलगीकरण करणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	--	१५६६५२/-	६ महिने	म.स.स.
४.	मौजे कुरूंद येथे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था करणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	१%	२०२४६१/-	६ महिने	खुला

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत कुरुंद. कार्यालयात दि. १७/११/२०२६ ते दि. २४/११/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा दि. २४/११/२०२६ पर्यंत रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा प कुरुंद.. येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक / ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कुरुंद.. यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. २५/११/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत कुरूंद.. ता पारनेर, जि-अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. कुरूंद, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. कुरूंद, ता. पारनेर, जि. अ.नगर







पाहिजेत
कॅशिअर- २ जागा
अनुभवास प्राधान्य
सावतामाळी नगर, अभंग पेट्रोलपंपशेजारी नवीन अकोले, रोड
9890045755

पाहिजेत
नर्सिंग स्टाफ - बीएससी/जीएनएम (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२, नाईट - २)
ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (मॉर्निंग-२, इव्हीनींग-२)
रिसेप्शनिस्ट - (इव्हीनींग-२ ते १०)
डाटा एन्ट्री - बी. कॉम (१ जागा)
मावशी/ वॉर्ड बॉय (२ जागा)
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

पाहिजेत
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

पाहिजेत
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
सेल्स सुपरवायझर ०१
गोडाऊन सुपरवायझर ०१
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा
महिला – २ जागा
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस दिला जाईल
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं. गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
गरजू व अनुभवी साईट इंजिनीअर, सुपरवायझर व ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
श्री मारूती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट, माळीवाडा, ता. संगमनेर
संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.
संगणक ज्ञान आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
• बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
• कार्यालयीन प्रशासक – १
• आयटी प्रोफेशनल – १
• संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १
पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१
कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
(टॅली ज्ञान अवश्यक)
जागा -१
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

गावोगावी बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि खोलीकरण करणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मागील काळात तालुक्यात केवळ माणसांची जिरवाजिरवी करण्याचे राजकारण झाले. मात्र, आम्ही माणसांची जिरवाजिरवी करण्याऐवजी जमिनीत पाणी जिरविण्याला प्राधान्य देत आहोत. यासाठी तालुक्यात लवकरच व्यापक जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येणार असून, गावोगावी बंधाऱ्यांची दुरुस्ती व खोलीकरण करून पाणीसाठा वाढविण्यावर भर दिला जाणार असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील देवकौठे येथे शिवसेना शाखेचा शुभारंभ तसेच जगदंबामाता मंदिर सभामंडपासह सुमारे १ कोटी ६ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार अमोल खताळ आणि गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आमदार खताळ म्हणाले की, आपण केलेली विकासकामे आणि केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ जनतेपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचतो, हे महत्त्वाचे आहे. जनतेने परिवर्तनाचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचे विकासकामांतून सिद्ध करण्याची जबाबदारी आपली आहे. विधानसभा, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये पाण्याचा प्रश्न केंद्रस्थानी राहिला आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

गेल्या दोन वर्षांत तालुक्यातील प्रत्येक गावाशी आपले जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे. प्रत्येक कार्यकर्ता आणि नागरिक हा आपल्या परिवाराचा भाग असून, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे हे आपले कर्तव्य आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करताना त्यांनी संगमनेरच्या जनतेवर विश्वास दाखविला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी असल्याने विरोधकांच्या कोणत्याही दबावाला आपण घाबरत नाही. विकासकामांच्या माध्यमातूनच विरोधकांना उत्तर देऊ, असा इशाराही त्यांनी दिला.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता आपण सत्कार स्वीकारणे बंद केले आहे. मात्र, ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते सत्कार होत असल्याने तो स्वीकारल्याचेही आमदार खताळ यांनी स्पष्ट केले. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक छबुराव सांगळे, जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, उद्योजक एकनाथ मुंगसे, प्रताप मुंगसे, डॉ. सुभाष मुंगसे, डॉ. संतोष डांगे, मयूर दिघे, दत्तात्रय दिघे, शाखाप्रमुख सुनील मुंगसे, उपशाखाप्रमुख अशोकराव कहांडळ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सुनील मुंगसे यांनी केले. सूत्रसंचालन अभियंता गणेश कहांडळ यांनी केले, तर अभिमन्यू मुंगसे यांनी आभार मानले.

निळवंडेच्या पाण्याने टंचाई कमी होण्यास मदत

निळवंडे धरणाच्या पाण्यामुळे देवकौठे परिसरातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत झाली आहे. सध्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने गावातील बंधारे पुन्हा भरतील. त्यामुळे शेतीसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असा शब्द राज्य सरकारने दिला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीप्रश्नासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला जात आहे, असेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

महाराष्ट्रात थंडीची चाहूल दुपारी उन्हाचा चटका कायम

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात सध्या हवामानाचा लपंडाव सुरू आहे. पहाटे आणि सकाळी उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे गारठा जाणवत आहे, तर दुपारच्या वेळी उन्हाचा चटका कायम आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात तापमानाचा पारा घसरू लागल्याने थंडीची चाहूल लागली आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या 'अकबन' चक्रीवादळामुळे १९ नोव्हेंबरच्या आसपास विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज नसला, तरी चक्रीवादळाच्या दिशेनुसार हवामानात बदल होऊ शकतो.स्कायमेटचे हवामान तज्ज्ञ महेश पलावत यांच्या माहितीनुसार, उत्तरेकडील डोंगराळ भागात पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. या भागात पुन्हा चक्रीय वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर काही ठिकाणी बर्फवृष्टी आणि पाऊस पडू शकतो. उत्तरेकडून थंड वारे महाराष्ट्राच्या दिशेने येत असल्याने राज्यात पहाटे आणि सकाळी थंडी जाणवत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात तापमानात घट होऊ लागली आहे. काही ठिकाणी शेकोट्याही पेटू लागल्या आहेत. मात्र, दुपारच्या वेळी तापमान वाढत असल्याने उकाडा कायम आहे. त्यामुळे सकाळी गारवा आणि दुपारी उन्हाचा चटका असे संमिश्र वातावरण अनुभवायला मिळत आहे.बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला असून त्यातून 'अकबन' चक्रीवादळ विकसित होत असल्याची माहिती आहे. या चक्रीवादळाच्या हालचालींमुळे १९ नोव्हेंबरच्या आसपास विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पान १ वरून

संगमनेरात चोरट्यांचे...

बाहेरगावी जाणाऱ्या कुटुंबांमध्येही असुरक्षिततेची भावना वाढली आहे. गेल्या दीड महिन्यात १७ घरफोड्या, महिलांच्या दागिन्यांची चोरी, बॅग लिफ्टिंग आणि बसस्थानक परिसरातील गुन्हे अशा घटनांची मालिका सुरू असताना गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काही ठिकाणी फिर्याद नोंदवून घेण्याबाबत टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. यामुळे पोलिसांवरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

महिलांचे दागिने आणि नागरिकांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यात पोलिसांना अपयश येत असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदारीचे आत्मपरीक्षण करावे, अशा तीव्र प्रतिक्रिया महिलांमधून उमटत आहेत. शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण नसल्याने पोलिस निरीक्षकांच्या बदलीची मागणीही जोर धरू लागली आहे.

दरम्यान, पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना माहिती द्यावी, घराबाहेर व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. शक्य असल्यास सोसायटीतील नागरिकांनी सामूहिकपणे दोन ते तीन कॅमेरे बसवावेत. परिसरात फिरणारे भंगारवाले, कपडेवाले, भांडेवाले तसेच अनोळखी व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवावे. एखादी संशयास्पद व्यक्ती वारंवार परिसरात येत असल्यास तिची माहिती घेऊन तातडीने पोलिसांना कळवावे, असे त्यांनी सांगितले. मात्र, नागरिकांनीच स्वतःच्या सुरक्षेची काळजी घ्यायची आणि पोलिसांनी केवळ आवाहन करायचे, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. संगमनेरकरांना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी पोलिसांनी आता ठोस कृती करणे गरजेचे आहे. अन्यथा चोरट्यांच्या वाढत्या धाडसामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवरील प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

२००६ च्या दिव्यांग शिक्षक भरतीचा अभिलेखच गायब

७० शिक्षकांच्या मूळ कागदपत्रांचा ठावठिकाणा नाही; ८९ नियुक्त्यांपैकी केवळ १९ नावांची नोंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील २००६ मधील विशेष दिव्यांग शिक्षक भरतीचा मुद्दा तब्बल २० वर्षांनंतर पुन्हा ऐरणीवर आला आहे. या भरती प्रक्रियेत नियुक्त झालेल्या ७० शिक्षकांच्या मूळ कागदपत्रांच्या संचिका, निवड प्रक्रियेचे अभिलेख आणि नियुक्तीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रेच उपलब्ध होत नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एकूण ८९ शिक्षकांची नियुक्ती झाल्याचे सांगितले जात असताना, जून २०२६ मध्ये तयार करण्यात आलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या यादीत केवळ १९ शिक्षकांची नावे आढळल्याने नियुक्त्यांच्या वैधतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाची जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

२००६ मध्ये झालेल्या विशेष दिव्यांग शिक्षक भरतीत एकूण ८९ शिक्षकांना नियुक्ती देण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, या भरतीशी संबंधित मूळ अभिलेखांची पडताळणी करताना ७० शिक्षकांच्या नावांचा आणि त्यांच्या नियुक्तीशी संबंधित कागदपत्रांचा ठोस मागोवा मिळत नसल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, जून २०२६ मध्ये तयार करण्यात आलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या यादीत तत्कालीन भरतीतील केवळ १९ शिक्षकांचीच नोंद असल्याची माहिती आहे.

त्यामुळे उर्वरित ७० शिक्षकांची नियुक्ती नेमकी कोणत्या आधारावर करण्यात आली? त्यांच्या निवडीची प्रक्रिया कशी पार पडली? दिव्यांग प्रमाणपत्रे, पात्रता प्रमाणपत्रे आणि नियुक्ती आदेशांच्या मूळ प्रती कुठे आहेत? तसेच भरतीचा मूळ अभिलेख उपलब्ध का नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांची उत्तरे चौकशीतूनच स्पष्ट होणार आहेत.



या प्रकरणाची माहिती जिल्हा प्रशासनाला मिळाल्यानंतर काही महिन्यांपूर्वी जुन्या अभिलेखांची पडताळणी सुरू करण्यात आल्याचे समजते. दिवाळीपूर्वीच सामान्य प्रशासन विभागाने या प्रकरणाची तपासणी हाती घेतल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. मात्र, तब्बल दोन दशकांपूर्वीची भरती असल्याने संबंधित संचिका, नियुक्ती आदेश, निवड समितीचे इतिवृत्त आणि अन्य महत्त्वाची कागदपत्रे शोधणे प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरत आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात यापूर्वी २०१० मधील बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणाने राज्यभर खळबळ उडवली होती. बदली टाळण्यासाठी काही शिक्षकांनी जिल्हा रुग्णालयाच्या नावाने बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे सादर केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणात तब्बल ७४ प्राथमिक शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती, तर संबंधितांविरुद्ध गुन्हेही दाखल करण्यात आले होते.

या घटनेनंतरही दिव्यांग प्रमाणपत्रांच्या वैधतेचा प्रश्न वेळोवेळी उपस्थित होत राहिला आहे. सध्या अनेक शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची नाशिक येथील आरोग्य उपसंचालक कार्यालय तसेच पुण्यातील ससून रुग्णालयाच्या स्तरावर पडताळणी प्रलंबित असल्याची माहिती आहे. अशा परिस्थितीत २००६ मधील भरतीच्या मूळ अभिलेखांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नामुळे शिक्षण विभागातील जुन्या नोंदींची विश्वासार्हता पुन्हा चर्चेत आली आहे.

विशेष म्हणजे, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात २००६-०७ मध्ये झालेल्या भरती प्रक्रियेत लेखी परीक्षेदरम्यान मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. या प्रकरणात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची सुटका झाली होती; मात्र तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली होती, तर तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. याच कालखंडात बहुचर्चित सव्वा कोटी रुपयांचा टँकर घोटाळाही समोर आला होता. त्यामुळे २००६ मधील दिव्यांग शिक्षक भरतीच्या अभिलेखांची चौकशी आता विशेष महत्त्वाची ठरणार आहे. भरतीत नियुक्त झालेल्या ८९ शिक्षकांपैकी ७० जणांची नावे मूळ अभिलेखात का नाहीत? जून २०२६ च्या यादीत केवळ १९ जणांचीच नोंद कशी झाली? संबंधित नियुक्त्यांना कोणत्या कागदपत्रांचा आधार होता? आणि मूळ संचिका नेमकी कुठे गायब झाली? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे मोठे आव्हान जिल्हा प्रशासनासमोर आहे. केवळ फाईल गहाळ झाल्याची नोंद करून हा विषय संपविण्याऐवजी, संपूर्ण भरती प्रक्रिया, नियुक्ती आदेश, दिव्यांग प्रमाणपत्रांची वैधता आणि अभिलेखांच्या जतनाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. चौकशीअंती नेमकी कोणती वस्तुस्थिती समोर येते आणि या प्रकरणात जबाबदारी कोणावर निश्चित होते,

जगातील कंपनी आली गावात, बेशिस्तीची सवय कर्मचाऱ्यांच्या स्वभावात

पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये आयटी कंपन्या असणे सामान्य बाब आहे. पण संगमनेर तालुक्यातील एका गावात बसून अमेरिका आणि युरोपमधील कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर तयार केले जात असेल, शेकडो इंजिनिअर्स तिथे काम करत असतील, तर ही गोष्ट नक्कीच लक्षवेधी ठरते. पारेगाव खुर्द येथील रावसाहेब घुगे यांनी हे प्रत्यक्षात करून दाखवले आहे. त्यांनी ग्रामीण भागात 'द बाप कंपनी' (The Baap Company) उभी केली. आता याच कंपनीच्या कामकाजासंदर्भात त्यांनी केलेली एक मिश्कील पोस्ट चर्चेत आली आहे.

'गावात कंपनी चालविण्याचे दुष्परिणाम... लोकं बिना परवानगीचे सुट्ट्या मारून गायब! काम गेले उडत!' असे घुगे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. दिवाळीच्या सणानिमित्त सुट्ट्यांचे नियोजन सुरू असताना त्यांनी ही टिप्पणी केली. अर्थात, दिवाळीला कुटुंबासोबत वेळ घालवणे आणि सुट्टीचा आनंद घेणे प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी महत्त्वाचे आहे. मात्र, दुसरीकडे कंपनीचे काम, ग्राहकांना दिलेल्या मुदती आणि प्रकल्पांचे नियोजन सांभाळण्याची जबाबदारीही उद्योजकावर असते. घुगे यांनी हाच विषय मिश्कील पद्धतीने मांडला आहे. मात्र या पोस्टमधील गंमतीपेक्षाही त्यांनी उभा केलेला उद्योग अधिक महत्त्वाचा आहे. कारण त्यांनी ग्रामीण भागातील तरुणांना आयटी क्षेत्रात संधी मिळावी, या उद्देशाने थेट आपल्या गावातच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कंपनी सुरू केली.



अमेरिकेतील अनुभव, गावात कंपनी उभारण्याचे स्वप्न-

रावसाहेब घुगे यांच्या प्रवासाची सुरुवातही संघर्षातून झाली. महाराष्ट्र टाइम्सने २९ मार्च २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, घुगे अमेरिकेत आयटी क्षेत्रात काम करत होते आणि त्यांची स्वतःची कंपनीही होती. ग्रामीण भागातील अनेक हुशार तरुणांना आयटी क्षेत्रात काम करण्याची क्षमता असूनही संधी अभावी त्यांना मोठ्या शहरांमध्ये जावे लागते, ही बाब त्यांच्या लक्षात आली. शेतकऱ्यांच्या मुलांना गावातच आयटी क्षेत्रात काम करण्याची संधी मिळावी, त्यांना मोठ्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागू नये, या विचारातून त्यांनी संगमनेर तालुक्यातील पारेगाव खुर्द येथे कंपनी उभारण्याचा निर्णय घेतला.

या कंपनीचे नाव BAAP ठेवण्यात आले. BAAP म्हणजे Business Applications and Platforms. सुरुवातीच्या काळात अकोले, संगमनेर आणि सिन्नर परिसरातील सुमारे ४५ तरुण-तरुणी या उपक्रमाशी जोडले गेले होते. ते घरून ऑनलाइन काम करत होते. त्यानंतर कंपनीच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन ४ ऑगस्ट २०२२ रोजी झाले. विशेष म्हणजे, कंपनीच्या प्रवेशद्वारावर शेतकरी वडिलांच्या टोपीची प्रतिकृती उभारण्यात आली. आपल्या वडिलांच्या संघर्षाची आठवण आणि त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त करण्याचा हा वेगळा प्रयत्न होता.

नेमके काय काम करते ही कंपनी?

अनेकांना आयटी कंपनी म्हटले की संगणकावर कोडिंग करणारे इंजिनिअर्स एवढेच चित्र डोळ्यांसमोर येते. मात्र, या क्षेत्रात अनेक प्रकारची कामे होतात. 'द बाप कंपनी' विविध व्यावसायिक संस्थांसाठी सॉफ्टवेअर आणि डिजिटल सोल्यूशन्स विकसित करते. एखाद्या कंपनीतील कर्मचाऱ्यांची हजेरी, पगार, सुट्ट्या आणि कामाचे व्यवस्थापन करण्यासाठी कस्टम सॉफ्टवेअर तयार केले जाते. ग्राहकांची माहिती, विक्री आणि व्यवहार सांभाळण्यासाठी उठच् प्रणाली विकसित केली जाते. याशिवाय शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि वाहतूक व्यवसायांसाठीही डिजिटल व्यवस्थापन प्रणाली तयार केल्या जातात.

आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच AI चा वापर वाढत आहे. कंपनीकडून AI व्हॉइस एजंट, स्वयंचलित ग्राहक सेवा, CCTV मधून चेहरा ओळखणे, वाहनांचे क्रमांक वाचणे आणि सुरक्षा अलर्ट अशा तंत्रज्ञानविषयक सेवाही विकसित केल्या जातात.

२५० हून अधिक इंजिनिअर्सची टीम!

कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवरील ऑक्टोबर २०२६ पर्यंतच्या माहितीनुसार, येथे २५० हून अधिक इंजिनिअर्स कार्यरत आहेत. कंपनीची १५ पेक्षा जास्त सॉफ्टवेअर उत्पादने असून १०० हून अधिक ग्राहक आहेत. २०२६ मध्ये कंपनीने अमेरिका, आफ्रिका आणि युरोपमधील ग्राहक जोडण्याचा व्यवसाय विस्तार सुरू केला आहे. म्हणजेच संगमनेर तालुक्यातील पारेगाव खुर्द या गावातून विकसित होणारे सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञान आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपर्यंत पोहोचत आहे. ग्रामीण भागात राहूनही जागतिक स्तरावर काम करता येते, हे या उपक्रमातून दिसून येते.

दिवाळीच्या सुट्ट्या आणि उद्योजकांसमोरील आव्हाने -

आता घुगे यांच्या पोस्टमधील मूळ विषयाकडे वळूया. दिवाळीच्या काळात प्रत्येकाला आपल्या कुटुंबासोबत सण साजरा करायचा असतो. कुणाला गावी जायचे असते, कुणाला नातेवाइकांना भेटायचे असते, तर कुणाला काही दिवस विश्रांती घ्यायची असते. हे अगदी स्वाभाविक आहे. मात्र, आयटी क्षेत्रातील कामाचे स्वरूप थोडे वेगळे असते. एखाद्या परदेशी ग्राहकाला ठरावीक तारखेला सॉफ्टवेअर किंवा प्रकल्पाचे काम हवे असते. त्यासाठी संपूर्ण टीमचे नियोजन करावे लागते. एखाद्या कामाची जबाबदारी सांभाळणारा कर्मचारी उपलब्ध नसेल, तर त्याचा परिणाम कामाच्या वेळापत्रकावर होऊ शकतो. त्यामुळे सुट्ट्यांचे पूर्वनियोजन, कामाचे हस्तांतरण आणि टीममधील समन्वय महत्त्वाचा ठरतो. कर्मचाऱ्यांचे कौटुंबिक आयुष्य आणि सणांचा आनंद जपत कंपनीचे कामकाजही सुरळीत ठेवणे, हे उद्योजकांसमोरील व्यवस्थापनाचे आव्हान असते.

गावात उद्योग उभा करण्याची हिंमतही महत्त्वाची!

आजही ग्रामीण भागातील अनेक तरुण शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी पुणे, मुंबई किंवा इतर मोठ्या शहरांकडे जातात. गावातच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित रोजगार उपलब्ध झाला, तर हे चित्र बदलू शकते. स्थानिक तरुणांना प्रशिक्षण मिळू शकते, त्यांचे कौशल्य वाढू शकते आणि गावातील आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळू शकते.

रावसाहेब घुगे यांनी पारेगाव खुर्द येथे आयटी कंपनी उभी करून ग्रामीण भागातून जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. एखादा उद्योग सुरू करणे आणि तो वाढवणे यासाठी मोठे धाडस लागते. त्यातही ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कंपनी उभारणे ही वेगळीच गोष्ट आहे. त्यामुळे घुगे यांच्या दिवाळीच्या सुट्ट्यांवरील मिश्कील पोस्टची चर्चा होत असताना त्यांच्या उद्योग उभारणीच्या प्रवासाकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. कारण सुट्ट्यांचे नियोजन हा कंपनी चालवतानाचा एक भाग आहे; पण पारेगावसारख्या गावात जागतिक स्तरावर काम करणारी आयटी कंपनी उभी करणे, ही त्यामागची मोठी गोष्ट आहे. शेवटी, गावात उद्योग उभा राहिला तर केवळ कंपनीचा व्यवसाय वाढत नाही, तर स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात. शहरांकडे धाव घेणाऱ्या तरुणांना आपल्या गावातच करिअर घडवण्याचा मार्ग मिळतो. पारेगाव खुर्दमधील रावसाहेब घुगे यांचा हा प्रयत्न ग्रामीण भागातील नवउद्योजकांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरू शकतो.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मातीचा धनी' ही प्रत्येकाच्या जीवनसंघर्षाची गोष्ट : आ. तांबे

सोनोशी येथे भाकरीच्या टोपलीतून पुस्तकाचे प्रकाशन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शेतीतील कष्ट, जिद्द आणि मुलांच्या शिक्षणाच्या जोरावर एक शेतकरी आपल्या संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य कसे बदलू शकतो, याची प्रेरणादायी कथा म्हणजे 'मातीचा धनी गोष्ट एका धाडसी बापाची' हे -पुस्तक होय. ही केवळ एका कुटुंबाची कहाणी नसून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाची आणि संघर्षातून उभे राहू पाहणाऱ्या प्रत्येक तरुणाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील सोनोशी येथे शेतीच्या बांधावर आयोजित कार्यक्रमात डॉ. एल. के. गिते लिखित आणि पेन पब्लिशिंग हाऊस पुणे प्रकाशित 'मातीचा धनी गोष्ट एका धाडसी बापाची' या पुस्तकाचे प्रकाशन आमदार तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, राजाभाऊ वाजे, आमदार हिरामण खोसकर, गोकुळ गिते यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

आंमदार तांबे पुढे म्हणाले की, मातीशी इमान राखून स्व. कारभारी (दादा) चिमाजी गिते यांनी आयुष्यभर शेती केली. कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर त्यांनी आपले कुटुंब उभे केले. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे प्रामाणिक चित्रण या पुस्तकातून समाजासमोर आले आहे. ग्रामीण भागातील युवकांना जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी आणि संघर्ष करण्याची प्रेरणा हे पुस्तक देईल. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक ग्रासीण संस्कृतीचे दर्शन घडविणारी आगळीवेगळी संकल्पना. भाकरीच्या टोपलीतून पुस्तके बाहेर काढत, घुडप्याची गाठ सोडून पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कृषी पंढरीचे वारकरी स्व. कारभारी (दादा) गिते यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त कारभारी दादा शिवार प्रतिष्ठानच्यावतीने कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना कृषी विज्ञान सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये डॉ. किशोर शिंदे (कृषी शिक्षण परिषद, पुणे), प्रा. तुषार उगले (कीटकशास्त्रज्ञ, के. के. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक), विठ्ठल बालाजी ढेरंगे (प्रगतिशील शेतकरी, खंडेरायवाडी, संगमनेर), प्रमिला बबन फंड (प्रगतिशील शेतकरी, सासेळा अडवाई, पारनेर), बद्रिनाथ रामभाऊ इंदापुरे (प्रगतिशील शेतकरी, रांजणगाव खुरी, पैठण), वीरेंद्र थोरात (संचालक, विश्व हायटेक नर्सरी वीरगाव, अकोले), पल्लवी बोंगे-इंगोले (यूट्यूबर, पंढरपूर) आणि दीपक जाधव (हवामानतज्ज्ञ व कृषी सल्लागार, चांदवड) याना सन्मानपत्र आणि बैलगाडीची प्रतिकृती असलेले सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी शिवराम सांगळे, बाळासाहेब फड, नितीन सांगळे यांच्यासह कीर्ती जायभाये, चेतन आव्हाड, बाळासाहेब गिते, तुषार गिते, संतोष गिते यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक तुषार गिते यांनी केले. तर मृद व जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते यांनी आभार मानले.

कुंभार समाजाला मोठा दिलासा

वर्षाला ७०० ब्रास माती उत्खननावर रॉयल्टी माफ



मुंबई (वृत्तसंस्था)

पिढीजात कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला बळ देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विटा, कौले तसेच अन्य मातीच्या पारंपरिक वस्तू तयार करण्यासाठी वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खनन करण्यास रॉयल्टीमधून सूट देण्यात आली आहे. कुंभार समाजाच्या व्यावसायिक अडचणी दूर करून त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने आता सर्वसमावेशक धोरण निश्चित केले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

या निर्णयानुसार गावातील तलाव, पाझर तलाव तसेच शेतकऱ्यांच्या शेतातील माती किंवा गाळ स्वखर्चाने काढून नेल्यास त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी संबंधित कुंभार व्यावसायिकांना 'महाखनिज' प्रणालीद्वारे तहसीलदारांकडे अर्ज करता येणार आहे. अर्ज केल्यानंतर १५ दिवसांच्या आत पाच वर्षांच्या वैधतेचे स्वतंत्र ओळखपत्र देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

माती उत्खनन आणि वाहतुकीचे परवाने ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाणार असून, माती वाहतुकीसाठी विनामूल्य पासही देण्यात येणार आहे. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करताना कुंभार समाजाला भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

कुंभार समाजाच्या व्यावसायिक विकासासाठी जिल्हास्तरावर 'एक खिडकी योजना' राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून सरकारी जागांवर कुंभार व्यावसायिकांसाठी क्लस्टर उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध होऊन पारंपरिक व्यवसायाला आधुनिक स्वरूप देण्यास मदत होणार आहे.

याशिवाय औष्णिक विद्युत केंद्रांमधून उपलब्ध होणारी पॉण्ड ॲश (राख) कुंभार व्यावसायिकांना सवलतीच्या दरात म्हणजेच प्रतिटन केवळ १०० रुपयांत उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामुळे उत्पादन खर्च कमी होण्यासह व्यवसायाला आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

या सर्व योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये कुंभार समाजाच्या प्रतिनिधींनाही सहभागी करून घेतले जाणार आहे. त्यामुळे समाजाच्या अडचणी, मागण्या आणि सूचनांचा विचार करून योजनांची अंमलबजावणी करणे शक्य होणार आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कुंभार समाजाच्या पिढीजात मातीच्या व्यवसायाला मोठा दिलासा मिळणार असून, पारंपरिक व्यवसायाचे संवर्धन, व्यावसायिकांना आर्थिक स्थैर्य आणि रोजगारवाढीस चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्यात अमित शहांचा दौरा, मोठे काहीतरी घडणार- मंत्री शिरसाठ

मुंबई (वृत्तसंस्था)

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडींचे संकेत मिळत आहेत. अमित शहा हे देशाचे गृहमंत्री आणि भाजपचे प्रमुख नेते आहेत; ते जिथे जातात तिथे आपला ठसा उमटवूनच निघतात. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात काही ना काही मोठ्या घडामोडी निश्चित घडतील, असे सूचक विधान शिवसेना (शिंदे गट) नेते संजय शिरसाट यांनी केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राजकीय समीकरणे, दुष्काळी मदत, 'ऑपरेशन टायगर' आणि विरोधकांच्या टीकेवर सविस्तर भाष्य केले.

गेल्या १५ दिवसांपासून राज्यात विविध राजकीय चर्चा सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर अमित शहा यांच्या दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले की, अमित शहा आणि मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात काय चर्चा झाली, हे फक्त त्यांनाच माहीत आहे. मात्र, विलीनीकरणाच्या चर्चा आणि इतर समीकरणे जुळवण्याचे प्रयत्न सुरू असताना, शहा यांनी मुद्दाम वेळ देऊन सर्व घटनांचा बारकाईने अभ्यास केला आहे. त्यामुळे आता ते या सर्व चर्चांना पूर्णविराम देत योग्य तो सोक्षमोक्ष लावतील, असा विश्वास शिरसाट यांनी व्यक्त केला.

शिवसेनेतील पक्षप्रवेशाच्या आणि 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चावर शिरसाट यांनी स्पष्ट भूमिका मांडली. सध्या काही पक्षांमध्ये कार्यकर्त्यांचा दुष्काळ पसरला असून ते सर्वत्र भटकताना दिसत आहेत. अनेकांनी आधीच घर सोडले असून ते पुन्हा मागे फिरणार नाहीत. 'ऑपरेशन टायगर' नक्की होणार असून त्याचा अंतिम टप्पा यशस्वी करण्याची जबाबदारी आणि तारीख ठरवण्याचा पूर्ण अधिकार एकनाथ शिंदे यांना आहे. ते नक्कीच हे अभियान यशस्वी करून दाखवतील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीबाबत माहिती देताना शिरसाट यांनी विरोधकांच्या आरोपांना उत्तर दिले. राज्य सरकारने केंद्राकडे २८००० कोटी रुपयांच्या मदतीची मागणी केली होती, त्यापैकी ११००० कोटी रुपयांचा पहिला टप्पा राज्याला प्राप्त झाला आहे.



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
(डॉ. जठार)
डॉ. नितीन जठार
एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी. कन्सल्टंट फिजिशियन तज्ज्ञ : खालीची हृदय रोग टी.बी. व दम्याचे विकार
डॉ.सौ. उज्ज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. कन्सल्टंट पेडियाट्रिशियन तज्ज्ञ : बालरोग, नवजात अर्भक इंटेन्सिव्युअर बेबी केअर
अत्याधुनिक कॅथलॅब
(Cath Lab)
शुभ दिपावली
दिवावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 | 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
• अतिदक्षता विभाग
• अपघात विभाग
डायलिसीस विभाग
• सुपर स्पेशालिटी विभाग
• न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
• मेडिसीन विभाग
• अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
• स्पाईन सर्जरी
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25